नवीन जी. एन. एम. अभ्यासक्रम महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत...

आधार मेडीकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे संचलित युनीक कॉलेज ऑफ नर्सिंग, आळेफाटा, युनीक हॉस्पिटल, मु.पो. आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२५/प्र.क्र.६४/२५ (ई-९६३४९३)/शिक्षण-१

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय मुंबई ४०० ००१.

दिनांक:- २७ नोव्हेंबर, २०२५

**वाचा** :

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र. एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१,दि.१३.०७.२०१८.
२. महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, यांचे पत्र क्र. मराशुवपशिमं/ नवीन जी एन एम/ न. प्र./१४३२/१६५१५/२०२४, दि.०९.०९.२०२४.
३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. डीएमईआर-११०१४/६२/२०२५-सीईटीआयटी, दि.२६.०५.२०२५.
४. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक नियामक मंडळाच्या दि. ०७.१०.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना:</u>

आधार मेडीकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे संचलित युनीक कॉलेज ऑफ नर्सिंग, आळेफाटा, युनीक हॉस्पिटल, मु.पो. आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेचा नवीन जी.एन.एम अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. (२) येथील पत्रान्वये महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. बृहत आराखड्याच्या कारणास्तव महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली नव्हती. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ च्या कलम २८(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारांनुसार संस्थेची सक्षमता तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. सदर संस्थेची सक्षमता तपासणी संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था नवीन जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त अहवालाच्या आधारे उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या शिफारशीच्या आधारे सादर केलेला अहवाल तसेच महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक नियामक मंडळाच्या दि.०७.१०.२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय विचारात घेऊन आधार मेडीकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे संचलित युनीक कॉलेज ऑफ नर्सिंग, आळेफाटा, युनीक हॉस्पिटल, मु.पो.

आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेस सन २०२५-२६ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, राज्य शासन व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी ए.एन.एम./जी.एन.एम. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट, १९८८ चा क्र.६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून त्यानुसार शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, शासकीय वैद्यकीय / आयुर्वेद/दंत / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या संस्थेत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी ए.एन.एम./जी.एन.एम. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची/मंडळाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्थेस विना- अनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली असल्याने संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्या शिफारशीस अनुसरून देण्यात येत आहे.

१०) सदर अभ्यासक्रमासाठी विहीत केलेल्या निकषांची पुर्तता संस्थेमार्फत होत असल्याची खात्री करून त्यानंतरच महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने संस्थेस संलग्नता प्रदान करावी. तसेच सदर संलग्नता मिळाल्यानंतरच संस्थेस विद्यार्थी प्रवेशित करता येतील.

११) संस्थेस कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

१३) संस्थेने विद्यार्थी प्रवेशित केल्यापासून सुरवातीच्या दोन वर्षांसाठी भाड्याने/भाडेपट्टीवर घेतलेल्या इमारतीत नर्सिंग महाविद्यालय चालवता येईल. तथापि, दोन वर्षानंतर संस्थेने स्वतःच्या इमारतीत संबंधीत अभ्यासक्रम चालविणे बंधनकारक असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP GORAKHNATH DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=418588839686584ca25060bf57af23a4473234ebcc421d084d8890fc37c8f673, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7B44D71EACB46FA051532FB66A73DA715F678033161C1162FA83F6713D03552, cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2025.11.27 12:58:58 +05'30'

(संदीप ढाकणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१ मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२ मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३ मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४ मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५ सचिव, भारतीय परिचर्या परिषद, ८ वा मजला, एनबीसीसी सेंटर, प्लॉट नं.२, कम्युनिटी सेंटर, ओखला फेज-१, नवी दिल्ली-११० ०२०.
६ सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
७ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
८ संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
९ प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
१० प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
११ अध्यक्ष/सचिव, आधार मेडीकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे
१२ निवडनस्ती (शिक्षण-१)